महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई-४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४ ई मेल: usecpr3.rddmh@nic.in

क्रमांक : व्हीपीएम-२०२०/प्र.क्र.३१२/पंरा-३ दिनांक : २०/०१/२०२१

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

विषय : महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ७ अन्वये घेण्यात येणाऱ्या ग्रामसभेस स्थगितीबाबत.

संदर्भ : समक्रमांकाचे शासन परिपत्रक दि. १५.०१.२०२१

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये social distancing चे व कोविड -१९ च्या अनुषंगाने निर्गमित मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अटीस अधीन राहून ग्रामसभा घेण्याबाबत परवानगी देण्यात आलेली आहे.

२. तथापि, राज्यातील बहुतांश ग्रामपंचायतीमध्ये दि. १५ जानेवारी, २०२१ रोजी सार्वत्रिक निवडणुका झाल्या असून अद्याप सदर ग्रामपंचायतीच्या सरपंचाची निवड झालेली नाही . मुदत संपलेल्या बऱ्याच ग्रामपंचायतीच्या ठिकाणी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. यापैकी बऱ्याच प्रशासकाकडे एका पेक्षा अधिक ग्रामपंचायतीचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे . त्यामुळे या प्रशासकास एकाच वेळी एका पेक्षा अधिक ठिकाणी ग्रामसभेचे अध्यक्षस्थान भूषविणे शक्य होणार नाही. त्यामुळे ग्रामसभा घेणे परिणामकारक ठरणार नाही. तसेच, काही जिल्ह्यामध्ये अद्यापही कोरोना बाधित रुग्णावर उपचार सुरु असून काही प्रमाणात कोरोनाचे सावट कायम आहे.

३. उपरोक्त बाबी विचारात घेता संदर्भाधीन दि . १५.०१.२०२१ रोजीच्या परिपत्रकास दि . ३१.०३.२०२१ पर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

(राजेश कुमार)
अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, सर्व विभाग
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, सर्व.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ७ अन्वये घेण्यात येणाऱ्या ग्रामसभेच्या आयोजनास परवानगी देणेबाबत .

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः व्हीपीएम- २०२०/प्र.क्र. ३१२ /पं.रा.-३**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
मुंबई ४०० ००१.
तारीख: १५ जानेवारी , २०२१

**वाचा :-**

१) **शासन परिपत्रक क्रमांकः** ग्राम विकास विभाग ,शासन परिपत्रक क्र.- ग्रापनी २०२०/प्र.क्र.२०/पंरा -२,दि .१२ मे,२०२०.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( १९५९ चा मुंबई अधिनियम क्र . ३ ) च्या कलम ७ नुसार प्रत्येक वित्तीय वर्षात निदान चार ग्रामसभांचे आयोजन बंधनकारक आहे .अशाप्रकारे ग्रामसभेचे आयोजन न केल्यास संबंधित सरपंच , उपसरपंच , आणि ग्रामसेवक यांना जबाबदार धरून त्यांच्या विरुद्ध कार्यवाही करणेची तरतूद आहे .

कोरोना विषाणूच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी शासन आदेश ,अधिसूचना निर्गमित केल्या आहेत . या शासन आदेशांनुसार सर्व प्रकारच्या सामाजिक, राजकीय सभा व संमेलनांवर बंदी घालण्यात आली होती . सदर आदेश व कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे असणारी आपत्कालीन स्थिती लक्षात घेता ग्रामसभेमध्ये असणारी ग्रामस्थांची उपस्थिती व त्यामुळे होणारी गर्दी ही आजाराच्या प्रार्दुभावाच्या दृष्टीने योग्य नाही . हि बाब विचारात घेता, संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये , ग्रामसभा घेण्यास तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती देण्यात आली होती . सद्यस्थितीत कोविडच्या अनुषंगाने लॉकडाऊन काळातील निर्बंधांमध्ये शिथिलता येत असून बहुतांश जनजीवन पूर्ववत होत असल्याने , संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये ग्रामसभांच्या आयोजनास देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती .

**शासन परिपत्रक:-**

कोविड -१९ या आजाराचे संक्रमण झपाट्याने वाढत असल्या कारणाने , गर्दी टाळण्याच्या दृष्टीने सामाजिक व सामुदायिक कार्यक्रमास प्रतिबंध करणारी नियमावली वेळोवेळी सार्वजनिक

आरोग्य विभागाने तसेच केंद्र व राज्य शासनाने शासन आदेश काढून निर्गमित केली होती . सदर आदेशांना अनुसरून विभागाने संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये , महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( १९५९ चा मुंबई अधिनियम क्र .३ ) च्या कलम ७ नुसार , ग्रामसभा घेण्यास पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती दिली होती .

आता. कोविडच्या अनुषंगाने लॉकडाऊन काळातील निर्बंधांमध्ये शिथिलता येत असून जनजीवन सुरळीत व पूर्वपदावर येत आहे . सदर बाब विचारात घेता, तसेच , ग्राम विकासात ग्रामपंचायतीच्या ग्रामसभांना असलेले अनन्य साधारण महत्व लक्षात घेता , ग्रामसभांचे पूर्वीप्रमाणे आयोजन होणे गरजेचे आहे . सबब, राज्यातील सर्व ग्रामपंचायतीना, त्यांच्या ग्रामसभा Social Distancing चे व कोविड -१९ च्या अनुषंगाने निर्गमित मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करून पूर्वीप्रमाणे ग्रामसभांचे आयोजन करण्यास परवानगी देण्यात येत आहे .

सदर आदेश हे परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील .

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०११५१४५०१०५२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Eknath k. gagare

Digitally signed by Eknath k. gagare
DN: cn=Eknath k. gagare, o=Eknath k. gagare, ou, email=eknath.gagare@nic.in, c=IN
Date: 2021.01.15 16:36:01 +05'30'

Issued by mail
18/01/21

( ए.का. गागरे )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
१. मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव/ सचिव
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा. विधानसभा , विधानपरिषद सदस्य व संसद सदस्य
५. मा. विरोधी पक्षनेते , विधानसभा / विधानपरिषद , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय , मुंबई
६. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
७. मा. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक

८. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

९. सर्व विभागीय आयुक्त

१०. सर्व जिल्हाधिकारी

११. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१२. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१३. सर्व उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय

१४. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद

१५. निवडनस्ती (कार्यासन पंचायत राज- ३)